


# उन्नती

लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचे माहितीपत्र

दुसरी आवृत्ती- सप्टेंबर, 2024

## लॉईड्स तर्फे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

'विविधतेतील एकता' हीच भारताची विशेषता आहे, आणि आमचा भारताच्या या विशेषतेवर दृढ विश्वास आहे. देशाच्या ७८व्या स्वातंत्र्यदिनाच्या महान प्रसंगी, संपूर्ण LIF कुटुंब एकत्र आले होते. हेड्री, सुरजागढ, कोनसरी आणि घुग्गुस या आमच्या प्रत्येक ठिकाणी स्वातंत्र्यदिनाचा प्रचंड उत्साह दिसून आला. खरा आनंद हा उत्सव एकत्र साजरा करण्यात दडलेला आहे हे आम्ही जाणतो, म्हणूनच आमच्या स्वतंत्र दिन सोहळ्यात मान्यवर तर उपस्थित होतेच, शिवाय जवळपासच्या गावातील लोकांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्सहात साजरा झाला. व्यवस्थापन विभागातील वरिष्ठ आणि संबंधित युनिट प्रमुखांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

लॉईड्स राज विद्या निकेतन स्कूल, हेड्री आणि जी डी गोएंका लॉईड्स पब्लिक स्कूल, घुग्गुसच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या काही अप्रतिम सांस्कृतिक कार्यक्रमांनी या राष्ट्रीय उत्सवाला आणखी खास बनवले.

कोनसरी येथे जिल्हा परिषद शाळेतील मुलांनी प्लांटच्या आवारात आयोजित केलेल्या भव्य परेडमध्ये सहभाग घेतला. यावेळी मान्यवरांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते विविध क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. स्थानिक गावातील तरुणांनी भव्य गोंडी नृत्य सादर केले. या कार्यक्रमात आजूबाजूच्या गावातील ६०० हून अधिक लोकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

हेड्री येथे, शालेय विद्यार्थ्यांनी एक अप्रतिम नृत्य कार्यक्रम सादर केला. यावेळी हॉस्पिटल, गारमेंट युनिट, शाळा, सुरक्षा, CSR आणि ORCs च्या कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट कामगिरी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. याशिवाय बास्केटबॉल व शॉटपुट खेळांचे आयोजन सुद्धा केले गेले.

घुग्गुस येथे, आमचे व्यवस्थापकीय संचालक, राजेश गुप्ता यांनी १० गावांतील बारावीच्या पहिल्या ३ क्रमांक धारक विद्यार्थ्यांना उत्कृष्टता पुरस्कारांचे वितरण केले. महाराष्ट्र राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री आणि चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घुग्गुस येथे झालेल्या या सोहळ्यात सहभाग घेतला.

LIF ची टीम प्रत्येक क्षेत्रात सर्वसमावेशक सहभागाद्वारे समाजात आणि लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. भारताच्या व्हिजन २०४७ च्या अनुषंगाने, आम्ही देशात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी कार्य करतो आहोत. या भागात आम्ही कार्यरत आहोत त्या भागातील लोकांची सेवा करत राहणे आणि त्या प्रदेशांना खऱ्या अर्थाने 'आत्मनिर्भर' बनवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.



### लॉयड्स २.०

लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनची टीम आरोग्यसेवा, शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार, उत्पन्नाच्या नव्या साधनांची निर्मिती आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रात विविध उपक्रम राबवत असते. आम्ही सेवा देत असलेल्या क्षेत्रात असे उपक्रम सक्रियपणे राबवणे हाच आमचा ध्यास आहे. स्थानिक लोकांच्या पाठिंब्याने अलीकडील काही उपक्रम राबवले गेले आहेत त्यांच्याबाद्द्ल आता जाणून घेऊ या.

### आरोग्यसेवा

- लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल, हेद्री, येथे एसटीआरसी वैद्य चिकित्सालयाचे उद्घाटन केले गेले. यामुळे एकाच ठिकाणी आधुनिक औषध शास्त्रे आणि पारंपारिक वनस्पती-आधारित उपचार या दोन्ही सर्वोत्कृष्ट आरोग्यसेवा पद्धती उपलब्ध झाल्या आहेत.
- LKAM हॉस्पिटलची संपूर्ण टीम गडचिरोली पोलिसांना आरोग्य तपासणी सेवा देण्याचे कार्य करते. या भागात हेदरी आणि सुरजागड सारख्या विविध AOPs येथे पोलिसांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सार्वजनिक आरोग्य शिबिरांमध्ये आरोग्य तपासणी सेवा देण्यासाठी आमची चमू सक्रियपणे कार्यरत आहे.

### रोजगार

- लॉईड्स वन्या क्लोदिंग कंपनी, हेड्री येथे शिलाई मशीन ऑपरेटरच्या नोकरीसाठी पुरसलगोंडी, तोडसा आणि नागुलवाडी गावे आणि पोलीस AOP – गट्टा, वांगेतुरी, गरदेवाडा, कांदोली बुर्गी, पिपली बुर्गी या ग्रामपंचायतींच्या अखत्यारीत येणाऱ्या महिलांची मोठ्या प्रमाणात भरती सुरू आहे.
- भरतकाम आणि आधुनिक कपडे धुण्याचे विभाग सुरू केले आहेत, ज्यातून नवीन रोजगार निर्माण होतील.
- लॉईड्स वन्याची टीम आपली पहिली क्लायंट ऑर्डर पूर्ण करण्यासाठी मनापासून काम करत आहे.

### महिला सक्षमीकरण

- कोर खाणकाम आणि यांत्रिक ऑपरेशन्समध्ये महिलांच्या वाढीव भूमिकेला प्रोत्साहन देण्यासाठी महिलांचे एक्साव्हेटर ऑपरेटर प्रशिक्षण घेण्यात आले. यात पहिल्या तुकडीत १५ महिलांची निवड करण्यात आली. १३ मे ते २ जून २०२४ या कालावधीत L&T Construction & Mining Machinery चे सेंट्रल ट्रेनिंग सेंटर, कांचीपुरम येथे हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. हे प्रशिक्षणार्थी सध्या LMEL च्या सुरजागढ लोहखनिज खाणीत ऑन द जॉब प्रशिक्षण घेत आहेत.
- एकूण १५ महिला सुरक्षा रक्षकांची पहिली तुकडी २६ जून २०२४ रोजी सुरक्षा प्रशिक्षण अकादमी, हेद्री मधून ३६ दिवसांच्या कठोर प्रशिक्षणानंतर उत्तीर्ण झाली. सध्या या महिला सुरक्षा रक्षक सीएसआर कॉम्प्लेक्स, हेड्री येथे शाळा, रुग्णालय, गारमेंट युनिट आणि अशा विविध संस्थांचे सुरक्षा व्यवस्थापन प्रभावीपणे करत आहेत.



### LIF ला कौतुकाची थाप

'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी'चा एक भाग म्हणून लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनी केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेत GMF गोल्डन पेटल्स अवॉर्ड्स आणि एक काम देश के नाम पुरस्कार लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनला देण्यात आले. हे पुरस्कार मिळाल्याबद्दल संपूर्ण टीम गौरवांवीत झाली. हे पुरस्कार बदल घडवून आणण्यासाठी, स्थानिक लोकांच्या आणि प्रदेशाच्या 'उन्नती'साठी सचोटीने प्रयत्न करणाऱ्या आमच्या वचनबद्धतेची पुष्टी करतात.

### कौशल्य विकास

- सुरजागड लोह खनिज खाणींच्या जवळपासच्या प्रकल्पग्रस्त गावांमधील एकूण १५३ लोकांना कौशल्य विकासाच्या संधी प्राप्त करून देण्यात आल्या. त्यांना उमरेड, नागपूर येथे मेसन आणि बार बेंडिंग प्रशिक्षणासाठी नियुक्त करण्यात आले. हे प्रशिक्षण १ जून २०२४ ते ३० ऑगस्ट २०२४ या कालावधीत घेण्यात आले.
- कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी आणि स्थानिक तरुणांना सक्षम बनविण्यासाठी लॉईड्स कौशल्या केंद्राचे उद्घाटन अंतुर्ला फाटा, घुगुस, चंद्रपूर येथे करण्यात आले. हे केंद्र सुरुवातीला इलेक्ट्रिशियन आणि मेकॅनिक-कम-फिटर जॉब भूमिकांचे प्रशिक्षण देत आहे. सध्या एका बॅचमध्ये ४० युवक आहेत. आता हि संख्या २०० विद्यार्थ्यांपर्यंत वाढवण्याची योजना आम्ही आखत आहोत.

### शिक्षण

- शालेय पुस्तके आणि इतर शालेय जीवनावश्यक वस्तू वाटप मोहीम कोनसरी आणि घुग्गुस येथे आयोजित करण्यात आली होती. या मोफत शालेय साहित्य वाटपाचा अनेक विद्यार्थ्यांना लाभ झाला.
- जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, कोनसरी येथे नवीन शाळेच्या इमारतीचे व भोजनगृहाचे उद्घाटन करण्यात आले असून सुमारे १५० विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला आहे.
- गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुका येथील हेड्री गावात लॉईड्स राज विद्या निकेतन शाळा आणि म्हातारा देवी, चंद्रपूर येथे जी. डी. गोएंका लॉईड्स पब्लिक स्कूल या दोन आधुनिक सुविधांनी सुसज्ज अश्या शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. उत्तम शिक्षक, दर्जेदार, मूल्य-आधारित शिक्षण घेण्याचे मार्ग या शाळांच्या माध्यमातून स्थानिक विद्यार्थ्यांनासाठी खुले झाले आहेत.
- कर्टिन युनिव्हर्सिटी प्रोग्रामच्या यशस्वी पहिल्या बॅचनंतर, विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या बॅचसाठी निवड प्रक्रिया पूर्ण झाली आहे, जे लवकरच त्यांचे प्रशिक्षण सुरू करणार आहोत.

### क्रीडा

- क्रीडा संघाने गेल्या तीन महिन्यांत जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विविध खेळांमध्ये एकूण ६७ पदके जिंकली आहेत.
- आमच्या तीन विद्यार्थ्यांची गडचिरोली पोलिस कॉन्स्टेबल परीक्षेत निवड झाली आहे, हा आमच्या टीमसाठी एक महत्वाचा आणि अभिमानाचा क्षण आहे.

## व्यवस्थापकीय संचालकांचा संदेश

**नमस्कार,**

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनचे त्रैमासिक असलेल्या 'उन्नती'च्या पहिल्या आवृत्तीला दिलेल्या प्रचंड प्रतिसादाबद्दल सर्वप्रथम मी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. तुमचा प्रतिसाद प्रेरणादायी आहे आणि आम्ही भविष्यातील आवृत्त्यांमध्ये अशीच गती कायम ठेवण्यास उत्सुक आहोत.

गडचिरोलीमध्ये लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडची स्थापना झाल्यापासून या भागाच्या स्थानिक विकासासाठी आम्ही कटिबद्ध झालेलो आहोत. लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन अंतर्गत, आम्ही सक्रियपणे विविध उपक्रमांचा पाठपुरावा केला आहे. स्थानिक विद्यार्थ्यांना परदेशात अभ्यासासाठी पाठवण्याचे आमचे स्वप्न सत्यात उतरताना पाहून आम्हाला आनंद होत आहे. सहा विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीने कर्टिन युनिव्हर्सिटी, ऑस्ट्रेलिया येथे त्यांचा शैक्षणिक प्रवास यशस्वीपणे सुरू केला असून, त्यांच्या कुटुंबासाठी, समुदायासाठी आणि प्रदेशासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे, हे निश्चित.

आम्ही अत्यावश्यक पायाभूत सुविधा आणि कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करून सुरुवात केली होती. आता आम्ही रुग्णालय आणि शाळा सुविधांचा विस्तार, रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि स्थानिक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आमच्या प्रयत्नांना अधिक गती देण्यास सज्ज झालेलो आहोत. या सुधारणांमुळे या भागातील प्रत्येकाला फायदा होईल आणि त्यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण परिवर्तन घडेल. मी लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन टीमचे विशेष कौतुक नक्कीच करीन. कारण, त्यांचे कार्य खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. आपला हा रूढार्थाने दुर्गम भाग, देशातील सर्वात समृद्ध बनवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. तुम्ही देखील आम्हाला पाठिंबा देत राहावा, हाच आमचा आग्रह आहे. या त्रैमासिकाच्या माध्यमातून तुमचा आवाज ऐकला जाईल. परिणामी आमच्या मी लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन च्या माध्यमातून तुमच्या समस्या सोडवल्या जातील, गरजा पूर्ण केल्या जातील याची खात्री आम्हाला आहे. यासाठीच आता आम्ही १०



गावांमध्ये पोहोच केंद्रे स्थापन केली आहेत. आमच्या कार्याबद्दल तुम्हाला काही संदेश द्यायचे असतील, तुमच्या कल्पना आणि अभिप्राय शेअर करायचे असतील, तर कृपया या केंद्रांना भेट द्या.

**हार्दिक शुभेच्छा,**

**बी प्रभाकरन**
**व्यवस्थापकीय संचालक**
**लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड**

## संपादकांचा संदेश



**नमस्कार!**

क्षेत्रातच नव्हे तर आसपासच्या लोकांनी केलेल्या अविश्वसनीय कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी समर्पित तुमचे स्थानिक माहितीपत्र 'उन्नती' च्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये आपले स्वागत. हि आवृत्ती विशेष आहे कारण हि समर्पित आहे गडचिरोली आणि चंद्रपूर येथील स्थानिक लोकांच्या प्रेरणादायी आणि परिवर्तनात्मक कथांबद्दलज्यावर लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनचा सकारात्मक परिणाम झालेला आहे.

आपण सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा आपला प्रवास सुरू ठेवत असताना, हा अंक आपल्यासाठी अभूतपूर्व उपक्रमांपासून ते सामुदायिक सक्षमीकरणाच्या हृदयस्पर्शी कथांपर्यंतच्या लेखांचा वैविध्यपूर्ण संग्रह घेऊन आला आहे. शिक्षण आणि आरोग्यसेवेपासून ते शाश्वत पद्धती आणि सामाजिक कल्याणापर्यंत, आम्ही आमच्या स्थानिक बांधवांच्या भावना आणि प्रगती प्रतिबिंबित करणाऱ्या कथांची निवड केली आहे.

आमच्या बहु-क्षेत्रीय प्रकल्पांद्वारे आम्ही केलेल्या प्रगतीबद्दल आणि स्थानिक रहिवाशांच्या जीवनावर त्यांचा होत असलेल्या सकारात्मक प्रभावाबद्दल जाणून घ्या. तुमचे विचार आणि अनुभव आमच्याबरोबर सामायिक करण्यासाठी आम्ही तुम्हाला आमंत्रित करतो. आपल्या समुदायाची भावना खरोखर प्रतिबिंबित करणारे एक मासिक म्हणून उन्नतीला आकार देण्यासाठी तुमचा अभिप्राय अमूल्य आहे. चला आपण आपल्या लोकांच्या कामगिरीचा आनंद साजरा करूया, एकमेकांना प्रेरित करूया आणि एकत्रितपणे उज्ज्वल भविष्य घडवत राहूया.

**चला तर आनंदाने वाचूया, आणि एकत्रपणे प्रगती करू या!**

**कीर्ती रेड्डी**
**संचालक**
**लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन**

CMYK

# ग्रामीण भागाचे सक्षमीकरण

## कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी च्या माध्यमातून सुरजागड आणि आजूबाजूच्या भागात घडवून आणलेले अमुलाग्र बदल

सुरजागड येथील आर्मड आऊट पोस्ट येथे शेतकरी क्लस्टर कार्यक्रमः सुरजागड येथील एओपी मध्ये नुकतेच शेतकरी कृषी मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. याचा उद्देश स्थानिक शेतकऱ्यांना अधिक सक्षम करणे असाच होता. प्रस्तुत मेळावा हा लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या 'इन्कम जनरेशन' टीम ने आयोजित केला होता. यामध्ये कृषी अधिकारी डोंगरे तसेच तोडासा आणि पूर-सालगोंडी या गावच्या सरपंचांनी तसेच ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. स्थानिक शेतकऱ्यांना लाभ व्हावा यासाठी राज्य सरकारने तयार केलेल्या विविध योजनांबाबत त्यांना माहिती देण्यात आली. एओपी च्या वतीने शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित अवजारे आणि बियाण्यांचं वाटप करण्यात आलं. एलआयएफ च्या वतीने भविष्यात राबविल्या जाणाऱ्या शेती संबंधित कार्यक्रमाबद्दल माहिती देण्यात आली.






### सुरजागड आणि गोडेली येथे मधुमक्षिका पालन कार्यक्रम

शेतकऱ्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी मधुमक्षिका पालनाचा कार्यक्रम सुरजागड आणि गोडेली या खेड्यांमध्ये सप्टेंबर महिन्यामध्ये सुरू करण्यात आला. दोन्ही खेड्यांतील सात शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदविला. सर्व सहभागी शेतकऱ्यांना मधुमक्षिका पालन करण्यासाठी 'हनी बी बॉक्सेस' आणि या संबंधित उपकरणे देण्यात आली. मधुमक्षिका पालनाच्या क्षेत्रात त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत व्हावा या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण तसेच कौशल्य विकास कार्यक्रम देखील राबविण्यात आला. या योजनेचा उद्देश स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती आणि ग्रामीण आर्थिक विकास करणे आहे.

### पेठा, करमपल्ली, आणि पूसुमपल्ली या गावांमध्ये बांबू रोपांचे वितरण

जंगलांचे संवर्धन व्हावे आणि भविष्यकाळात उत्पन्नाचे साधन निर्माण व्हावे या उद्देशाने बांबू रोपट्यांचे वितरण पेठा, करमपल्ली, आणि पूसुमपल्ली या गावांतील शेतकऱ्यांना करण्यात आले. पूसुमपल्ली गावामध्ये बांबू रोपट्यांचे रोपणही करण्यात आले आणि ग्रामस्थांना बांबूचे विविध उपयोग तसेच त्यापासून फर्निचर, अन्न, इंधन, आणि कापड कसे बनवता येते याबद्दल सांगण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण रक्षण तसेच स्थानिक आर्थिक उन्नती हे दोन्ही उद्देश साध्य होणार आहेत.

### सुरजागड आणि मांगर या ठिकाणी किचन गार्डन

किचन गार्डनच्या माध्यमातून महिलांना आर्थिक प्राप्तीचे साधन उपलब्ध व्हावे या दृष्टीने सुरजागड आणि मांगर या गावातील 52 महिलांना बीज वितरण करण्यात आले. आता या महिला घरात उत्पन्न झालेल्या भाज्यांचा वापर सकस आहार म्हणून तर करतीलच शिवाय अतिरिक्त भाजीपाल्याची विक्री करून उत्पन्नाचं नवं साधन देखील प्राप्त करतील. या योजनेने अन्नसुरक्षा तर प्राप्त होईलच शिवाय स्थानिक महिलांचे देखील सक्षमीकरण साध्य होईल.

### मल्लमपहाडी येथे स्वच्छता अभियान आणि आंबा रोपांचे वितरण

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन तर्फे ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटावं यासाठी मल्लमपहाडी खेड्यामध्ये स्वच्छता अभियान राबवण्यात आले. ग्रामस्थांनी यात हिरीरीने सहभाग घेतला. गावामध्ये यावेळी आंबा रोपट्यांचे वितरण करण्यात आले. यांच्या लागवडीमुळे गावातील हिरवळ वाढीस लागेल तसेच भविष्यात उत्पन्नाची नवीन साधने ग्रामस्थांना प्राप्त होतील. सामाजिक स्वास्थ्य तसेच पर्यावरण रक्षणासाठी फाउंडेशन कटिबद्ध असल्याचं हे प्रतीक आहे.



# पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या कोनसरी येथील कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी टीम च्या सर्व सदस्यांनी आणि कलावंतांनी एक अभिनव उपक्रम राबविला. कोनसरी, उमरी, चंदनखेडी, काडोळी, आणि रामपूर या जवळपासच्या खेड्यांमध्ये पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा हा उपक्रम होता. पथनाट्याच्या माध्यमातून स्थानिक लोकांमध्ये साथीचे रोग, व्यसने आणि त्यामुळे होणारे नुकसान याबद्दल जनजागृती करण्यात आली. आजकालच्या आधुनिक जगामध्ये समाजमाध्यमे आणि इंटरनेटचा प्रभाव असला तरी सुद्धा पथनाट्यामुळे कशा पद्धतीने सामाजिक परिवर्तन घडवून आणले जाऊ शकते हे या उपक्रमातून दिसून आले. पथनाट्याच्या माध्यमातून लोकांपर्यंत आरोग्य आणि व्यसनमुक्तीचा संदेश फार प्रभावीपणे पोचवण्यात आला. ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या आणि त्यांचे विषय त्यांच्याच भाषेत अतिशय उत्तम रीतीने मांडण्यासाठी पथनाट्याचे माध्यम उपयोगी आलं.

पथनाट्याच्या माध्यमातून झालेली जनजागृती पाहू जाता आमच्या टीमने गेल्या अनेक महिन्यांपासून गडचिरोली जिल्ह्यातील नक्षल प्रभावित खेड्यांमध्ये अंधश्रद्धा, चुकीच्या रूढी परंपरा, आरोग्य आणि शिक्षण तसेच कौशल्य विकास या विषयांवर जनजागृती केली आहे. गट्टा, अलिंगा, अडांगे, ताडगुडा, नींदेर, हेड्री, तीतोडा, जांभिया, आणि यासारख्याच इतर अनेक खेड्यांमध्ये पथनाट्य सादर करण्यात आले. अत्यंत दुर्गम भागात असलेली ही खेडी अगदी प्राथमिक सुविधांपासून देखील वंचित राहिलेली आहेत. पथनाट्याच्या माध्यमातून या लोकांना एकमेकांशी आणि मुख्य प्रवाहांशी जोडण्याचं एक महत्त्वाचं काम सुद्धा साध्य झालं.

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी टीमच्या माध्यमातून एटापल्ली मधील हेड्री या गावी रुग्णालय, शाळा, गारमेंट युनिट, यासारख्या अनेक सुविधा आणि पायाभूत सुविधांचे निर्माण केले गेले आहे. याशिवाय स्थानिक लोकांना उत्पन्नाचे स्त्रोत प्राप्त व्हावे या दृष्टीने अनेक उपक्रम राबवले गेले आहेत. येथील स्थानिक लोकांमध्ये आधुनिक सुविधा आणि सोयी यांच्या बद्दल अनेक गैरसमज होते. अजूनही आपल्या जुन्या आणि कालबाह्य झालेल्या गोष्टींनाच धरून ते व्यवहार करत असत. एल. आय. एफ. च्या माध्यमातून त्यांच्यामध्ये नवीन तंत्रज्ञान आणि आधुनिकीकरण याबद्दल गैरसमज मिटवण्यात आले आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी त्यांना तयार करण्यात आले. पथनाट्यांनी या कार्यामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. स्थानिक लोकांना मनोरंजनाचे एक नवीन साधन उपलब्ध झाल्यामुळे या पथनाट्यांना लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. पथनाट्याचे हे प्रभावी माध्यम अशाच प्रकारे वापरून ग्रामीण जनजीवनामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचे आमचे ध्येय असणार आहे.

# पायाभूत सुविधांच्या विकासाद्वारे गावांचा झाला कायापालट

गडचिरोली जिल्ह्याच्या दक्षिण भागात असलेला एटापल्ली तालुका समृद्ध नैसर्गिक साधनसंपत्ती असूनही गेल्या अनेक दशकांपासून विकासापासून दूर आहे.

स्थानिक नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित राहिले होते. जेव्हा लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडने सुरजागढ लोह खनिज खाणींमध्ये आपले कार्य सुरू केले, तेव्हा लोकांचे जीवन सुलभ करण्यासाठी आणि सुधारण्यासाठी जवळपासच्या गावांमध्ये मूलभूत पायाभूत सुविधा विकसित करण्यास सुरुवात केली.

मूलभूत पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये रस्ते बांधणी, हातपंप, ओव्हरहेड पाण्याच्या टाक्या, सामुदायिक नळ, तलाव आणि विहिरींचे पुनरुज्जीवन, शाळा आणि कम्युनिटी हॉल पुनर्विकास, पथदिवे बसवणे, ग्रंथालय, संगणक प्रयोगशाळा आणि बरेच काही समाविष्ट होते.

मांगेर गावातील तलावाचे पुनरुज्जीवन झपाट्याने सुरू आहे आणि लवकरच स्थानिकांसाठी विरंगुळा आणि विश्रांतीचा आनंद घेण्यासाठी हे नयनरम्य ठिकाण बनणार आहे. याव्यतिरिक्त, LMEL टीम आणि इतर भागधारकांसह वेगवेगळ्या गावांमध्ये इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांवर काम करत आहेत. अखंडित पाणीपुरवठा करण्यासाठी हेड्री, गोडेली, इटुलनार, पुरसलगोंदी आणि आलेंगा या पाच गावांमध्ये बोअर खोदण्यात आले आहेत.

**ग्रामस्थांच्या विशेषतः** महिलांच्या सोयीसाठी हेड्री, गोडेली, इटुलनार आणि आलेंगा या चार गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नवीन हातपंप बसविण्यात आले आहेत. ग्रामस्थांच्या विनंतीनुसार, झारेवाडा गावात आमच्या बसवलेल्या ओव्हर हेड वॉटर टँक (10 KL) पासून सरकारी पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनला जोडणी देण्यात आली आहे.

तसेच पाण्याची गळती रोखण्यासाठी व ग्रामस्थांना अखंडित पाणी मिळावे यासाठी हेड्री गावात (3 हातपंप) आणि मांगेर गावात (1 हातपंप) पिण्याच्या पाण्याच्या हातपंपांची दुरुस्ती व देखभालीचे काम करण्यात आले आहे. याशिवाय, ग्रामस्थांना चांगल्या दर्जाचे, पिण्यायोग्य पाणी नेहमी उपलब्ध व्हावे, यासाठी आरओ प्लांट बसवला जाईल. मांगेर आणि मल्लमपहाडी गावात आरओ ट्रिटमेंट प्लांट शेड बांधण्यासाठी दोन लोखंडी संरचनेचे काम पूर्ण झाले आहे. कोणत्याही प्रदेशाच्या विकासाचा मार्ग हा दर्जेदार पायाभूत सुविधांच्या माध्यमातूनच सुकर होत असतो. आम्हाला खात्री आहे की आम्ही केलेल्या या कामांद्वारे, या दुर्गम भागात सुलभता येईल आणि या भागाची अर्थव्यवस्था आणि संबंधित बाबी येत्या काही वर्षांत भरभराटीला येतील.




# बदलाची मुळे: आमचे हरित उपक्रम



निसर्ग आणि स्थानिक परिसंस्थेप्रती आमच्या संस्थेच्या बांधिलकीचा एक भाग म्हणून, आमच्या प्रत्येक कार्यक्षेत्राच्या ठिकाणी म्हणजेच सुरजागढ, कोनसरी आणि घुग्गुस येथे वृक्षारोपण मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवली जात आहे. या पर्यावरण दिनी, आमच्या संपूर्ण टीमने वृक्षारोपण आणि हिरवाईचे संवर्धन करण्याची 'ग्रीन प्रतिज्ञा' घेतली. 'जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण थांबवणे आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ न देणे' या थीमसह बांदे नदीच्या बाजूच्या शिबिरात वृक्षारोपण मोहीम घेण्यात आली. एटापल्ली तालुक्यातील आलदंडी गावात आंबा रोपट्यांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमात स्थानिक ग्रामस्थ, मुले, वन अधिकारी आणि लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड, लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनच्या टीमचा सहभाग होता. यानिमित्ताने एलआयएफ टीमतर्फे गावोगावी पर्यावरण सप्ताह साजरा करण्यात आला. एकरा खुर्द गावात आयोजित चित्रकला स्पर्धेत ५० हून अधिक प्रतिभावंत विद्यार्थी कलाकारांनी सहभाग घेतला. आपल्या पृथ्वीबद्दलच्या त्यांच्या भवना त्यांच्या कॅनव्हासवर चमकदारपणे उमटल्या. मुलांनी कलेच्या माध्यमातून निसर्गाच्या सौंदर्याची त्यांच्या मनातील परिकल्पना समोर आणली. आमच्या आदरणीय प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते जागतिक पर्यावरण दिनी विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. स्थानिक ग्रामस्थांनी सुद्धा या कलाकारांना प्रोत्साहन दिले.

पर्यावरणविषयक उपक्रम हे एक दिवस किंवा एक सप्ताह नव्हे तर वर्षभर सुरु राहिले पाहिजेत असा आमचा विचार आहे. निसर्गाने आपल्याला दिलेल्या या पर्यावरणरुपी प्रसादासाठी आपण सर्वांनी निसर्गाचे सदैव ऋणी असले पाहिजे. गडचिरोली हे रमणीय ठिकाण असल्याने आणि मुख्य लोकसंख्या त्यांच्या उपजीविकेसाठी जंगलांवर अवलंबून असल्याने येथील लोकांना स्थानिक वनराईबद्दल खूप काळजी आहे. आम्हीदेखील एक संस्था म्हणून पर्यावरणाच्या रक्षणासाठी कटिबद्ध आहोत. सौर पॅनेलची स्थापना, खाणींमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वापर, खाणींच्या ठिकाणी नियमितपणे पाणी शिंपडणे, समर्पित ट्रक वॉशिंग सिस्टीम असे अनेक उपक्रम आमच्या माध्यमातून राबवले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय अनुपालन पण पर्यावरण रक्षणाच्या बाबतीत असलेली आमची कटिबद्धताच दिसून येते.




# स्थानिक युवकांचे सक्षमीकरण: लॉईड्स कौशल्य केंद्राचे उद्घाटन



स्थानिक युवांमध्ये कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी आणि तरुणांना सक्षम बनविण्यासाठी लॉईड्स कौशल्य केंद्राचे उद्घाटन अंतुर्ला फाटा, घुग्गुस, चंद्रपूर येथे करण्यात आले. उदघाटन चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा (IAS), जिल्हा कौशल्य केंद्राचे सहायक आयुक्त भैय्याजी येरामे आणि लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (LMEL) चे उपाध्यक्ष-HR पवन मेश्राम यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कुशल कामगार तयार करण्यासाठी सुलभ, दर्जेदार शिक्षण प्रदान करणे हा या केंद्राचा उद्देश आहे. हे केंद्र सुरुवातीला इलेक्ट्रिशियन आणि मेकॅनिक-कम-फिटर जॉब रोल्सचे प्रशिक्षण देईल. सध्याची बॅच ही ४० प्रशिक्षणार्थ्यांची आहे. लवकरच २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांपर्यंत विस्तार करण्याची आमची योजना आहे. यानंतर के कौशल्य केंद्र चंद्रपूरच्या आर्थिक विकासात लक्षणीय योगदान देणार आहे. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी आपल्या भाषणात आजच्या अर्थव्यवस्थेतील कौशल्य विकासाची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली आणि स्थानिक तरुणांचे उत्थान आणि शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने निर्माण झालेल्या या उपक्रमाच्या क्षमतेची प्रशंसा केली. एलएमईएलचे श्री पवन मेश्राम सामाजिक विकास आणि कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्वासाठी कंपनीच्या वचनबद्धते बद्दल भाष्य केले. त्यांनी केंद्राच्या भूमिकेवर भर दिला आणि या भागातील तरुणांसाठी हे केंद्र आशा आणि प्रगतीचा किरण ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त केला.



# आमचे 'आउटरीच वर्कर्स म्हणजेच ORW'

कोणत्याही उपक्रमाच्या यशाची गुरुकिल्ली म्हणजे टीम वर्क. आमच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) प्रकल्पांद्वारे लोकांच्या जीवनावर प्रत्यक्ष प्रभाव पाडण्याचे आणि सकारात्मक बदल घडवण्याचे कार्य आम्ही करत असतो. हे कार्य आमच्या ऑन-ग्राउंड टीम, ज्यांना आम्ही 'आउटरीच वर्कर्स (ORW)' म्हणून संबोधतो, त्यांच्या अथक प्रयत्नानेच शक्य होते. कुद्री, नागुलवाडी, करमपल्ली, पेठा, एकरा खुर्द, बांडे, हेड्री, सुरजागड, पुरसलगोंडी आणि आलेंगा या गावांमध्ये आमच्या १० आउटरीच सेंटर्स (ORCs) मध्ये २७ आउटरीच वर्कर्स एकूण ३ ग्रामपंचायतींमधील २१ गावांना सेवा देत आहेत.

आमच्या ORW ची भूमिका वैविध्यपूर्ण आणि गतिमान आहे. त्यांच्या अंतर्गत असलेल्या गावांच्या संख्येनुसार, संबंधित ORC मध्ये प्रत्येक केंद्राखाली दोन ते तीन ORW कार्यरत आहेत. जेव्हा जेव्हा कोणत्याही गावकऱ्याला कोणत्याही समस्येचा सामना करावा लागतो, काही माहिती जाणून घ्यायची असते, काही मदतीची आवश्यकता असते, किंवा काही समस्या असते तेव्हा हे ग्रामस्थ सहजपणे जवळच्या ORC मध्ये जाऊ शकतात. आमची टीम त्यांची पूर्ण मदत करते, त्यांना आवश्यक पाठिंबा देते आणि त्यांच्या समस्येवर आवश्यक कारवाई सुद्धा करते. गावकऱ्याचा एखादा अर्ज आणि विनंती असेल तर तिच्या तपशिलांसह योग्यरित्या त्यांचे दस्तऐवजीकरण केली जाते, सरकारदफ्तरी त्याचा पाठपुरावा केला जातो, मागोवा घेतला जातो आणि प्रभावी तसेच कालबद्ध पद्धतीने ग्रामस्थांची समस्या सोडविली जाते. त्याचप्रमाणे, जेव्हा जेव्हा ORW नियमितपणे गावांचा दौरा करतात, तेव्हा ते पुढील कारवाईसाठी मुद्दे टिपतात. लोकांपर्यंत, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला आणि दिव्यांगांपर्यंत पोहोचण्यासाठी आमचे ORW हे अत्यंत परिपूर्ण आणि प्रभावी मध्यम आहेत.

कोणत्याही उपक्रमाच्या अंमलबजावणीत आणि यशस्वीतेमध्ये ORWs महत्त्वाची भूमिका बजावतात. अशी अनेक उदाहरणे आहेत जिथे ORW ने त्यांच्या केवळ नोकरीच्या भूमिकेतून बाहेर पडून अतिरिक्त प्रयत्न केले आहेत. अश्या काही उदाहरणांची माहिती आता जाणून घेऊया –

जेव्हा जेव्हा खेड्यांमध्ये वैद्यकीय मदत आणि रुग्णवाहिकेची तातडीची गरज असते तेव्हा वेळेवर वैद्यकीय सुविधा



सुनिश्चित करण्यासाठी गावात कार्यरत असेलेले आमचे ORWs आमच्या CSR टीम आणि लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल टीमशी संपर्क साधतात. त्याचप्रमाणे गर्भवती महिला ANC प्रकरणे, अपघात, अश्या परिस्थितीत गरजूंना वैद्यकीय सुविधा मिळवून देण्याच्या कामात देखील आमचे ORWs आघाडीवर आहेत. सीएसआर टीमने एक उपक्रम सुरू केला आहे ज्यामध्ये पूर्व-निर्धारित वेळापत्रकानुसार गावांसाठी बससेवा सुरू करण्यात आली आहे. तपासणी आणि सल्लामसलत करण्यासाठी रुग्णालयात येण्याची इच्छा असलेले गावकरी या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. या बस सुविधे बद्दलची माहिती ORWs आपापल्या गावांमध्ये देतात आणि ग्रामस्थांना कोणत्याही मदतीची आवश्यकता असल्यास समन्वय साधतात. आमच्या ORW ने केलेल्या प्रयत्नांमुळे आम्ही राबविलेले लोकोपयोगी उपक्रम वेळोवेळी अधिक प्रभावीपणे आणि लोकाभिमुखपणे राबविले गेले आहेत. लॉईड्स वन्या क्लोदिंग कंपनीच्या ऑपरेशन्स आणि ऑर्डर्सची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. याची पूर्तता करण्यासाठी, स्थानिक गावांमधून अतिरिक्त महिला कामगारांची आवश्यकता भासते. महिलांसाठी कौशल्य आणि रोजगाराच्या या संधीबाबत ORWs ही माहिती गावांमध्ये प्रसारित करतात आणि येथे काम करण्यामुळे होणारे फायदे त्यांना समजावून सांगतात. कौशल्य प्रशिक्षणाचे, नोकरीचे अर्ज करण्यापासून, आवश्यक तेथे पडताळणी प्रक्रियेतही या महिलांना ORWs ची मदत होते. एखाद्या कामगाराकडे काही समस्या निर्माण झाल्यास, आणि कामावर येणे शक्य नसल्यास गैरहजेरी समस्या उद्भवतात. अश्यावेळी तेव्हा ORWs च्या मदतीने CSR टीम प्रत्येक कुटुंबाला भेट देऊन कारण जाणून घेते, सल्ला देते आणि सुधारात्मक पावले उचलते. काही गावे खरोखर दुर्गम भागात वसलेली आहेत. अजूनही येथून येण्यासाठी योग्य रस्ते नाहीत. मधूनमधून असणारे नाले आणि ओढे यांमुळे विशेषतः पावसाळ्यात, लोकांना गावापर्यंत लांब पायी जावे लागते. अश्या परिस्थितीत CSR टीमला या भागांमध्ये मदत पुरवण्यासाठी जावे लागते. याशिवाय महिला कामगार दुर्गम भागातून कामावर येणे कठीण असल्याने काम बंद करतात. अश्यावली या महिलांना गैरहजेरी कमी करण्यासाठी आणि कामावर परत येण्यासाठी समुपदेशन करण्यासाठी जावे लागते. अश्या परिस्थितीत ORWs त्यांच्या नोकरीच्या पलीकडे जाऊन, नियमितपणे अश्या दुर्गम भागात अडथळयांवर मात करून पोचतात, आणि लोकांशी संपर्क करतात. आपल्या कामाची वेळ संपल्यावर देखील ORWs या ग्रामस्थांसाठी कार्यरत असतात. ORW साठी त्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी नियमित प्रशिक्षण दिले जाते. हेड्री येथील लॉईड्स राज विद्या निकेतन शाळेच्या निर्मिती नंतर ORWs ने गावकऱ्यांना शाळेतील सुविधा आणि शिक्षणाविषयी समजावून सांगितले. इतकेच नव्हे तर विद्यार्थ्यांचे फॉर्म भरण्याचे काम सुद्धा केले.

लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीमध्ये नावनोंदणी करण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना सुद्धा ORW मदत करतात. ORW प्रत्येक गावाला भेट देतात आणि दिल्या जाणाऱ्या सुविधा, आगामी क्रीडा शिबिरे आणि उपक्रमांची माहिती देतात. ग्रामस्थांसाठी गावपातळीवर विविध सरकारी योजनाची अंमलबजावणी करण्यासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन सर्वेक्षण करणे आवश्यक असते. या दृष्टीने, ORWs घरोघरी जाऊन तपशीलवार सर्वेक्षण करण्यात मदत करतात. जेव्हा जेव्हा आम्हाला स्थानिक लोकांपर्यंत पोहोचण्यात अडचण येते तेव्हा ORWs च आमच्या मदतीला धावून येतात आणि ग्रामस्थ आणि कंपनीच्या मधील एक दुवा म्हणून कार्य करतात. यादृष्टीने ORWs आमच्यासाठी एक मोठे वरदानच आहेत. विविध गावांमध्ये CSR अंतर्गत नवीन उपक्रम राबविण्यासाठी, या योजनांसाठी योग्य लाभार्थी निवडण्यासाठी, आणि योजनांच्या प्रगतीचा पाठपुरावा करण्यासाठी ORW ची भूमिका अधिकच महत्त्वाची असते.

# आमच्या आउटरीच वर्कर ची प्रेरक गोष्ट - अमिषा पुंगाटी



आउटरीच वर्कर्स (ORWs) हे लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनच्या CSR उपक्रमांचा कणा आहेत, ते संस्था आणि २१ प्रकल्प-बाधित गावांमधील संपर्काचा दुवा म्हणून काम करतात. त्यांचे समर्पण आरोग्यसेवा, शिक्षण आणि रोजगाराच्या संधींची यशस्वी अंमलबजावणी सुनिश्चित करते, स्थानिक समुदायांचे सक्षमीकरण करते.

अमिषा पुंगाटी, पेठा गावातील ORW, हिने तिच्या प्रेरणादायी प्रवासाबाद्दल सांगितले. आर्थिक अडचणींशी झगडत आणि दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करत असताना तिने बारावी पूर्ण केली. मात्र त्यानंतरही भविष्य काय हे निश्चित नव्हतेच. सुरजागढ लोह खनिज खाणीतील अधिकाऱ्यांनी नोकरीच्या संधीसाठी संपर्क साधला तेव्हा, तेव्हा सुरुवातीला अमिषाने संकोच केला. परंतु इतर स्थानिक मुलींना त्यांच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडताना पाहून तिला धैर्य मिळाले.

आज, अमिषा आत्मविश्वासाने CSR सर्वेक्षण टीमचा एक भाग म्हणून काम करते, वैयक्तिकरित्या गावांना भेट देते. तिच्या दृढनिश्चयाने केवळ तिचे स्वतःचे जीवनच बदलले नाही तर तिच्या गावातील इतर मुलींनाही त्यांच्या प्रगतीच्या नव्या संधी शोधण्यासाठी प्रेरित केले. धाडस करून अमिषाने तिच्या कुटुंबाला गरिबीतून बाहेर काढले, आर्थिक स्थैर्य मिळवून दिले आणि स्वतःचे वाहन घेण्याचे तिचे स्वप्न पूर्ण केले. आज ती लॉईड्स मेटल्स सुरजागढ प्रकल्प आणि CSR टीमबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. ती म्हणते कि या टीमनेच तिच्या आयुष्याला आकार दिला आणि तिच्या कुटुंबाला आनंद दिला. अमिषाची कथा ही समुदाय-चालित उपक्रमांच्या सामर्थ्याचा पुरावा आहे आणि तिचा प्रवास लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन या गावांमध्ये करत असलेल्या सकारात्मक प्रभावाचे प्रतिबिंब आहे.

CMYK

# पूर्व विदर्भात शिक्षणाचा विस्तार आणि सामुदायिक उपक्रम

## चंद्रपूर: जी डी गोएंका लॉईड्स पब्लिक स्कूल सुरू




लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने महाराष्ट्रातील चंद्रपूर येथील म्हातारा देवी येथे जी.डी. गोएंका लॉईड्स पब्लिक स्कूल सुरु केले आहे. आमच्यासाठी अतिशय अभिमानास्पद अशी ही बाब आहे. नर्सरी ते इयत्ता चौथीपर्यंत सीबीएसई शिक्षण देणाऱ्या या नवीन शाळेचे उद्‌घाटन कार्यकारी संचालक श्री. मधुर गुप्ता आणि मुख्याध्यापक जेसी रॉय यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. उद्‌घाटन झाल्यानंतर पालकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य आणि दर्जेदार शिक्षण देण्यासाठी जी.डी. गोयंका समुह सुप्रसिद्ध आहे. त्यांच्याच सहकार्याने या शाळेच्या कॅम्पसची निर्मिती करण्यार आली आहे. हिरव्या मोकळ्या जागा, वाय-फाय सुविधा, आधुनिक ग्रंथालये आणि प्रयोगशाळा असलेले हे अत्याधुनिक कॅम्पस आहे. शाळेचे उद्दिष्ट शैक्षणिकदृष्ट्या मजबूत, सामाजिकदृष्ट्या जबाबदार विद्यार्थ्यांना वाढवण्याचे आहे आणि लवकरच संगीत, नृत्य आणि खेळ यासह अनेक अतिरिक्त कौशल्य विकासाच्या संधी येथे उपलब्ध होणार आहेत. शाळेच्या विस्तारासाठी इतरही योजना सुरू आहेत. भविष्यात सर्वांगीण विकास आणि नैतिक नेतृत्व यावर लक्ष केंद्रित करून इयत्ता बारावीपर्यंतची शाळा विकसित करण्याचे आमचे धोरण आहे.




## कोनसरी : नवीन संगणक प्रशिक्षण केंद्राचे उद्‌घाटन

२७ एप्रिल २०२४ रोजी, कोनसरी गावात संगणक प्रशिक्षण केंद्राचे उद्‌घाटन केले गेले. सहा संगणकांनी सुसज्ज असलेले केंद्र तीन महिन्यांच्या कालावधीत सहा बॅचमध्ये ३६ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देईल. उद्‌घाटन कार्यक्रमास सरपंच श्रीकांत पावडे, उपसरपंच रतन अक्केवार, संचालक- सी. एस. आर. किर्ती रेड्डी आणि इतर स्थानिक मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जातील, जे या प्रदेशात डिजिटल साक्षरता वाढविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून ओळखले जाईल.

## एटापल्ली : स्कूल बस सेवा सुरू

एटापल्ली नगर पंचायत यांच्या सहकार्याने एटापल्ली ते आलापल्ली प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या वाहतुकीच्या समस्यांना उपाय म्हणून स्कूल बस सेवा सुरू केली आहे. या बसचे उद्‌घाटन नगर पंचायत अध्यक्षा श्रीमती दिपयंती पेंदाम आणि लॉईड्स मेटल्सचे कार्यकारी संचालक श्री एस. व्यंकटेश्वरन यांच्या हस्ते करण्यात आले. वेळेवर आणि आरामदायी प्रवास सुनिश्चित करणे, आणि शैक्षणिक प्रवेश सुधारणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या सेवेच्या लोकार्पण कार्यक्रमाला स्थानिक विद्यार्थी, एटापल्लीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री चैतन्य कदम आणि ब्लॉक विकास अधिकारी श्री आदिनाथ आंधळे यांच्यासह स्थानिक मान्यवर उपस्थित राहिले.




## कोनसरी : शाळेतील विविध सुविधांचे नुतनीकरण

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोनसरी, येथे शाळेच्या नवीन इमारतीचे आणि जेवणाच्या सुसज्ज हॉलचे उद्‌घाटन केले गेले. पूर्वीच्या या शाळेला जागेच्या अडचणीचा सामना करावा लागत होता. आता नवीन आणि सुसज्ज वर्गखोल्या तसेच नूतनीकरण केलेल्या अंगणवाडीमुळे ही अडचण संपली आहे. नवीन सुविधांच्या उद्‌घाटनाचे वेळी श्री प्रभाकरन बालसुब्रमण्यम (व्यवस्थापकीय संचालक, LMEL) आणि इतर मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. नवीन वर्गखोल्या आणि शाळेचा नवनिर्मित परिसर इयत्ता १ ते ४ मधील १४० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सुविधा देणार आहे. या मुलांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासा करीता एक आदर्श वातावरण या नवीन इमारतीच्या माध्यमातून निर्माण होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात शैक्षणिक संधी आणि सामाजिक विकास घडविण्यासाठी लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन सतत वचनबद्ध हे. प्रस्तुत सर्व उपक्रम आमची हीच वचनबद्धता दर्शवितात.

## उद्याचे नेतृत्व घडवितांना : एल.आय.एफ.चे शैक्षणिक प्रयत्न

आम्ही नुकतीच जिल्हा परिषद हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, कोनसरी येथे कार्यशाळा आयोजित केली होती, ज्यामध्ये इयत्ता ९ वी ते १२ वी च्या १३७ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. श्री चंद्रशेखर राव वुरा आणि श्री महादेव मडावी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त मुलांपर्यंत शैक्षणिक सुविधा पोचल्या पाहिजेत या एल. आय. एफ. च्या वचनबद्धतेवर आम्ही भर दिला. शालेय साहित्याचे मोफत वितरण ही केवळ एक सुरुवात आहे. पुढील काळात विविध पद्धतीने शैक्षणिक क्षेत्रात सहयोग करण्याचे आमचे नियोजन आहे.

याव्यतिरिक्त, एल.आय.एफ. ने LRVN शाळा, हेड्री आणि जिल्हा परिषद शाळा, कोंसारी येथे आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिन साजरा केला. मुलांमध्ये विचार करण्याची शक्ती आणि आणि धोरणात्मक कौशल्ये वाढवण्याच्या उद्देशाने बुद्धिबळ हे अतिशय महत्त्वाचे आहे. आमच्या या प्रयत्नाच्या माध्यमातून गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्य घडवून आणणारे शिक्षण मिळावे, शिवाय त्यांचा अभ्यासक्रमेतर विकास सुद्धा व्हावा हेच आमचे ध्येय आहे.

## सामुदायिक सहभागाचा अनुभव शेअर करतांना इंटर्नशिपचे विद्यार्थी


ईशा रौतेला


क्रितीन रौतेला

"गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या प्रकल्प स्थळाला आम्ही भेट दिली. या भेटीमुळे भारतातील सर्वात मागासलेल्या समुदायांपैकी एक असलेल्या माडिया जमातीच्या जीवनाबद्दल सखोल माहिती मिळाली. स्थानिक आदिवासी रेश्मा लालू गुंडरू आणि निर्मला विजा पुंगाटी यांच्या मार्गदर्शनाखाली, आम्ही हेड्री गावाला भेट दिली. येथील माडिया लोकांचा आणि त्यांच्या जीवनाचा जंगलाशी अतूट असा संबंध आहे. त्यांच्या भाषेत आणि दैनंदिन व्यवहारातून सुद्धा जंगल हेच त्यांचे जीवन असल्याचे दिसून येते. माडिया जमातीचा समृद्ध सांस्कृतिक वारसा त्यांच्या कुशल कारागिरीतून दिसून येतो. जसे की बांबूच्या टोपल्यांचे क्लिष्ट विणकाम आणि लीफ प्लेट्सचे टिकाऊ उत्पादन हे लोक लीलया करून दाखवतात. आम्ही त्यांच्या पारंपारिक शिकार पद्धतीचा देखील अनुभव घेतला. इतकेच नव्हे तर आमच्या वास्तव्यादरम्यान त्यांच्या अनोख्या सामाजिक रीतिरिवाजांचे निरीक्षण करायला मिळाले. दहा दिवस चालणाऱ्या त्यांच्या लग्न समारंभाला देखील उपस्थित राहता आले. यातून आम्हाला त्यांच्या वेगळ्या जीवनशैलीची झलक मिळाली."

"या आदिवासी लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती मिळावी, यासाठी लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन सातत्याने प्रयत्नशील आहे. शिक्षण, आरोग्य सेवा, रोजगार, कौशल्य विकास क्षेत्रात त्यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत ज्यातून त्यांची प्रतिबद्धताच दिसून येते. गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने, आर्थिक समावेशन आणि साक्षरतेला चालना देऊन फाउंडेशनची सामाजिक सहभागिता अधिक बळकट झाली आहे. त्यांचे महिला सक्षमीकरण उपक्रम, जसे की महिला सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देणे, महिलांना जड वाहने चालवण्याचे प्रशिक्षण देऊन खाण क्षेत्रात जड वाहन चालक म्हणून नियुक्त करणे, या सर्व उपक्रमांतून स्त्री पुरुष समानता आणि महिलांच्या आर्थिक विकासाप्रती लॉईड्सची बांधिलकी दिसून येते."

"आमच्या या अनुभवातून आम्ही जाणले कि शाश्वत विकास उपक्रमांना राबवत असतानाच माडिया जमातीचा सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे कार्य सुद्धा केले जात आहे. लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचा CSR बाबतचा सर्वांगीण दृष्टिकोन केवळ स्थानिक आदिवासी समाजाला सक्षम करणे इतकाच नसून त्यांच्या शाश्वत भविष्यालाही चालना देणे, हा आहे. म्हणूनच लॉयड्स मुळे या क्षेत्रांतील माडिया जमातीच्या जीवनावर आणि त्यांच्या भविष्यावर देखील एक महत्त्वपूर्ण असा सकारात्मक प्रभाव पडताना दिसून येतो आहे."

## विकासाची यात्रा: शुभम गोटा यांचा ऑस्ट्रेलियात अभ्यासाचा अनुभव

गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना थेट कर्टिन युनिव्हर्सिटी, ऑस्ट्रेलिया येथे शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी देणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम म्हणजे लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचा मान बिंदूच! या कार्यक्रमासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचा एक भाग म्हणून गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील पेठा गावातील शुभम गोटा हा विद्यार्थी ऑस्ट्रेलियाला शिक्षण घेतो आहे. जीवन बदलवून टाकणारा आपला अनुभव त्याने कथन केला.


शुभम गोटा

कर्टिन युनिव्हर्सिटीच्या डिप्लोमा इन हेल्थ सायन्सेस कोर्समध्ये प्रवेश घेतलेल्या शुभमने या संधीचे वर्णन त्याच्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले. "परदेशात प्रवास करण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. उत्साह तर होताच, शिवाय अस्वस्थता देखील जबरदस्त होती," शुभम म्हणाला. "लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचे गजानना सर हे मला आणि इतर पाच विद्यार्थ्यांना या नवीन अध्यायाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करत अतुलनीय असा पाठिंबा देत आहेत. त्याच्या मार्गदर्शनाबद्दल आम्ही मनापासून कृतज्ञ आहोत," त्याने सांगितले.

ऑस्ट्रेलियामध्ये शुभमला एका विविधतेने नटलेल्या आणि सर्वसमावेशक अश्या सामाजिक परिस्थितीत सर्वांसह राहण्याचा अनुभव प्राप्त झाला आहे. येथे विविध पार्श्वभूमीतील आणि देशांतील विविध लोक सामंजस्याने राहतात. "कर्टिन विद्यापीठ एकमेकांप्रती आदर आणि सर्वसमावेशकतेचे वातावरण वाढवते. मी वेगवेगळ्या देशांतून मित्र बनवले आहेत आणि आमचे सांस्कृतिक अनुभव सामायिक करण्याचा आनंद घेतला आहे. सॉकर गेम्स, बीच आउटिंग आणि सर्फिंगसह आम्ही विकेंड साजरे करतो. कर्टिन येथे शैक्षणिक आणि अभ्यासेतर क्रियाकलाप दोन्हीवर लक्ष केंद्रित केले जाते. जीवन बदलणारी ही संधी आम्हाला उपलब्ध करून दिल्याबद्दल मी एमडी श्री बी. प्रभाकरन सर यांचा आभारी आहे."



# लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीने राज्य ॲथलेटिक स्पर्धेत मिळविले देदीप्यमान यश

**गडचिरोली आणि त्याहून पुढे :** लॉईड्स स्पोर्ट्स अकादमी (LSA) क्रीडा क्षेत्रात, जिल्हा ते राष्ट्रीय स्तरापर्यंत लक्षणीय प्रगती करत आहे. स्थानिक तरुण प्रतिभेला प्रोत्साहन देऊन त्यांच्यातून जागतिक दर्जाचे खेळाडू निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून ही अकादमी स्थापित करण्यात आली आहे. आज अकादमी मध्ये ॲथलेटिक्स, तिरंदाजी, फुटबॉल, व्हॉलीबॉल आणि कबड्डीमध्ये अव्वल दर्जाच्या सुविधा आणि प्रशिक्षण देण्यात येत आहे. एटापल्ली तालुक्यातील कृष्णार गावात मुख्य सुविधेसह आणि हेड्री आणि कोनसरी येथील अतिरिक्त केंद्रांसह, आमच्या विविध क्रीडा उपक्रमांद्वारे स्थानिक युवक आणि लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड कर्मचाऱ्यांना मदत करते.

**जिल्हा ते राज्य स्तरावर यश:** १२ मे २०२४ रोजी झालेल्या गडचिरोली जिल्हा युवा ॲथलेटिक मेळाव्यात, आमच्या युवा संघाने उत्कृष्ट कामगिरी करत ७ सुवर्ण, ६ रौप्य आणि २ कांस्य पदके मिळवली. ही उल्लेखनीय कामगिरी अकादमीचे प्रशिक्षण किती कठोर आणि दर्जेदार आहे हेच दाखवून देते. सर्व सुवर्ण आणि रौप्य पदक विजेते जून २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्यस्तरीय युवा ॲथलेटिक मेळाव्यासाठी पात्र झाले आहेत आणि पुढील यशाचा टप्पा निश्चित केला आहे.

**राज्यस्तरीय उपलब्धी:** आमच्या प्रतिभावंत खेळाडूंनी १ जून ते ३ जून २०२४ या कालावधीत नागपुरातील ७२ व्या महाराष्ट्र राज्य वरिष्ठ आणि युवा ॲथलेटिक मेळाव्यात आपली प्रभावी कामगिरी दाखवून दिली. अकादमीच्या खेळाडूंनी युथ मुलींच्या गटात रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली, नोवामी एडेने ३००० मीटर चालण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक जिंकले उंच उडीत मोनिका मडावीने कांस्यपदक जिंकले. या उपलब्धी आमच्या उच्च-स्तरीय क्रीडा प्रतिभा विकसित करण्याच्या समर्पणाला अधोरेखित करतात.

**सामाजिक समरसता:** लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने आपल्या CSR उपक्रमाद्वारे इटुलनार येथे २७ जून ते ३० जून २०२४ या कालावधीत आंतर-ग्रामीण क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले होते. व्हॉलीबॉल आणि टग-ऑफ-वॉर स्पर्धांचा समावेश असलेल्या या कार्यक्रमाने २० गावातील संघांना आकर्षित केले आणि सामुदायिक एकतेवर भर दिला. कोनसारी गावाने व्हॉलीबॉल स्पर्धा जिंकली, तर कृष्णार गावाने टग-ऑफ-वॉरमध्ये विजय मिळविला आणि स्थानिक लोकांमध्ये असलेली खिलाडू वृत्तीचे दर्शन घडविले.













**राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्टता:** आमचे विद्यार्थी इंदूर येथील नवव्या सब-ज्युनियर आणि ज्युनियर नॅशनल मिनीगोल्फ चॅम्पियनशिपमध्ये देखील चमकले. अभय दुर्वा याने मिनीगॉल्फ सांघिक स्पर्धेत रौप्यपदक मिळवले, तर हर्षल मोहुर्ले आणि आयुष घोष यांनी मिनीगॉल्फ दुहेरीत सुवर्णपदक पटकावले, त्यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले.




**फुटबॉलमधील विजय:** फुटबॉलमध्ये, LSA च्या संघाने ५ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०२४ या कालावधीत तेलंगणातील कागजनगर येथे स्वामी विवेकानंद राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत आपल्या पराक्रमाचे प्रदर्शन केले. एकूण १८ संघांविरुद्ध स्पर्धा करून आमचे खेळाडू अंतिम फेरीत पोहोचले आणि नागपूर विरुद्ध निकराची झुंझ देऊन उपविजेते म्हणून स्वतःला सिद्ध केले. लॉईड्स स्पोर्ट्स अकादमी युवा खेळाडूंच्या विकासासाठी आणि गावपातळीवर क्रीडा पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी समर्पित आहे. समर्पित प्रशिक्षकांच्या टीमकडून सतत पाठबळ मिळाल्याने आम्ही भविष्यात आणखी मोठे टप्पे गाठण्यासाठी सज्ज आहोत.

## लॉईड्स स्पोर्ट्स अकादमी अंतर्गत हल्लीच्या काळात करण्यात आलेले उपक्रम

### (जून ते ऑगस्ट 2024)

**01** आमच्या स्पोर्ट्स अकादमीच्या खेळाडूंनी महाराष्ट्र सब-ज्युनियर फुटबॉल संघाचे प्रतिनिधित्व केले आणि नाशिक येथे ७ ते १० जून २०२४ दरम्यान झालेल्या सहाव्या SDPF राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले.

**02** खेळाडूंनी महाराष्ट्र मिनीगॉल्फ संघाचे प्रतिनिधित्व केले आणि इंदूर येथे झालेल्या नवव्या सब-ज्युनियर आणि ज्युनियर राष्ट्रीय मिनीगॉल्फ स्पर्धेत सब-ज्युनियर मुलांच्या एकेरी गटात रौप्य पदक आणि ज्युनियर मुलांच्या दुहेरी गटात सुवर्ण पदक मिळवले.

**03** कागजनगर, तेलंगणा येथे झालेल्या स्वामी विवेकानंद राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत लॉईड्स स्पोर्ट्स अकादमी फुटबॉल संघ उपविजेता ठरला.

**04** इटुलनार गावात जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल (पुरुष) आणि टग ऑफ वॉर (महिला) स्पर्धेचे आयोजन केले होते, ज्यामध्ये अनेक ग्रामस्थांनी उत्साहाने भाग घेतला.

**05** हेड्री आणि कोनसरी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला, ज्यामध्ये संस्थेतील २३०० हून अधिक लोक आणि जवळपासच्या गावातील नागरिकांचा मोठया प्रमाणात सहभाग होता. लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीच्या खेळाडूंनी या दरम्यान आयोजित केलेल्या विविध मॅरेथॉन स्पर्धांमध्ये प्रभावी कामगिरी नोंदवली.

**06** आमच्या संस्थेची सामाजिक बांधिलकी जपून आम्ही स्थानिक तरुणांना गडचिरोली पोलीस भरतीसाठी शारीरिक चाचण्यांच्या तयारीसाठी मदत केली याचा खूप अभिमान आहे. आमचे तीन विद्यार्थी - प्रकाश मिरी, नागेश्वर रस्से आणि अनिकेत अल्लेवार यांची गडचिरोली पोलीस कॉन्स्टेब्युलरीच्या परीक्षेत निवड झाली.

**उन्हाळी शिबिरासाठी मुलांची आवड वाढत असून यावेळी कृष्णार येथील उन्हाळी शिबिरासाठी 200 हून अधिक मुलांनी नोंदणी केली होती. गावपातळीवर ५० हून अधिक मुले संबंधित शिबिरांमध्ये नियमितपणे सहभागी होत असत. कबड्डी, व्हॉलीबॉल, फुटबॉल, तिरंदाजी, ॲथलेटिक्स या क्रीडा सुविधा निर्माण केल्या जात असून, 10 गावांमध्ये काम पूर्ण झाले आहे. याव्यतिरिक्त, लॉईड्स तर्फे गडचिरोलीमध्ये विविध ठिकाणी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात.**



# आमच्या खेळाडूंचा प्रेरणादायी प्रवास

लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीची स्थापना गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील दुर्गम, आदिवासी भागातील क्रीडा प्रतिभेचे संगोपन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने करण्यात आली. उन्हाळी शिबिराच्या रूपात जे सुरू झाले ते आता उच्च दर्जाच्या सुविधा, तज्ञ प्रशिक्षक आणि पायाभूत सुविधांसह पूर्णपणे विकसित क्रीडा अकादमीमध्ये विकसित झाले आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील ही मुळे आज आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची आकांक्षा बाळगून अकादमीकडे येत आहेत.

अतुलनीय समर्पणाच्या जोरावर अकादमीने एक परिवर्तनात्मक प्रभाव या भागात घडवून आणला आहे. अनेक विद्यार्थी आता जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अकादमीचे प्रतिनिधित्व करतात, ॲथलेटिक्स, मिनीगोल्फ, फुटबॉल आणि व्हॉलीबॉल यासारख्या खेळांमध्ये खेळाडूंनी १०० हून अधिक पदके जिंकली आहेत.



या प्रतिभावान खेळाडूंमध्ये एटापल्ली तालुक्यातील कृष्णार गावातील एक चमकता तारा आहे मोनिका मडावी. मोनिकाने २०२२ मध्ये अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत तिच्या प्रवासाला सुरुवात केली. तिच्या चिकाटीने आणि कठोर प्रशिक्षणामुळे, मोनिका उंच उडीमध्ये राज्य चॅम्पियन बनली आहे, गडचिरोली जिल्ह्यातून उंच उडीत प्रथम राज्य पदक विजेती ठरली आहे.

मोनिकाच्या कामगिरीमध्ये राज्य आणि जिल्हा क्रीडा स्पर्धांमध्ये अनेक सुवर्णपदकांचा समावेश आहे. प्रतिभा, कठोर परिश्रम आणि दृढनिश्चय हे कसे अडथळे दूर करू शकतात आणि यशाकडे नेऊ शकतात हे दाखवणारी मोनिका तिच्या समाजाची खरी प्रेरणा आहे. आमचा विश्वास आहे की मोनिकाच्या उज्ज्वल भविष्याची नुकतीच सुरुवात झाली आहे. अकादमी गडचिरोलीतील जागतिक दर्जाच्या खेळाडूंची पुढील पिढी विकसित करण्यासाठी वचनबद्ध आहे.

# लॉईड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटल, हेड्री येथील रुग्णांच्या हृदयस्पर्शी कथा...

एकरा येथील श्रीमती रिना कोवासी या महिलेचे दुसरे बाळ कमी वजनाचे आणि आजारी जन्माला आले. या बाळाला लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल मध्ये तब्बल २० दिवस एनआयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. येथील डॉक्टर्स आणि परिचारिकांनी बाळाची चोवीस तास काळजी घेतली आणि त्याच्यावर उपचार केले. शेवटी उपचाराअंती गुटगुटीत झालेल्या बाळाला पूर्ण निरोगी स्थितीत रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली. आज हे बाळ निरोगी आहे आणि त्याची वाढसुद्धा योग्य रीतीने होत आहे. त्याच्या आईने डॉक्टर्स आणि कर्मचारी यांनी दिलेल्या अविरत सेवेमुळेच आपले बाळ आज निरोगी असल्याची भावना व्यक्त केली.

परसलगोंडी येथील अंकिताने आपल्या ५ महिन्यांच्या बाळाचे वजन कमी झाल्यामुळे आणि विकासास उशीर झाल्यामुळे बाळाला रुग्णालयात आणले. विशेष आहार योजना आणि काळजी घेतल्याने बाळाचे वजन स्थिर झाले. त्याच्या वाढीचे टप्पेही त्याने योग्य रीत्या पार केले. आता बाळ अगदी ठणठणीत आहे. बाळाच्या आई बाबांनी रुग्णालयाचे आभार मानले आहेत.

एकरा येथील शारदा गावडे त्यांच्या ४ दिवसांच्या बाळाला सेप्सिस आणि हायपो-ग्लायसेमियाने त्रस्त झाल्यामुळे त्या चिंतेत होत्या. बाळाला हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले. येथे बाळाला योग्य ते उपचार मिळाले आणि आता तो निरोगी आहे. डॉक्टर आणि परिचारिका यांनी घेतलेल्या काळजीबद्दल शारदा यांनी त्यांचे कौतुक केले.

याशिवाय गट्टा येथील ६ वर्षीय संध्या होडीवर हॉस्पिटलमध्ये गंभीर ॲनिमिया आणि सिकलसेल आजारावर यशस्वी उपचार करण्यात आले. तब्बल १३ दिवस आयसीयूमध्ये राहिल्यानंतर, रूग्णालयाच्या तज्ञ डॉक्टर्स आणि परिचारिकांनी घेतलेल्या काळजीमुळे तिची प्रकृती सुधारली आणि शेवटी तिला आरोग्य पूर्ण अवस्थेत डिस्चार्ज देण्यात आला.



# वैद्य चिकित्सालय आणि रुग्णवाहिका सेवांसह लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनने केली सामुदायिक आरोग्य सेवेची प्रगती




लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनने, STRC गडचिरोलीच्या सहकार्याने, या भागात आरोग्यसेवेची उपलब्धता वाढावी यासाठी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. फाऊंडेशनने अलीकडेच हेड्री येथील लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल येथे 'वैद्य चिकित्सालया' चे उद्घाटन केले आणि एटापल्ली येथे अत्यंत आवश्यक अशी रुग्णवाहिका सेवा सुरू केली. हे उपक्रम दुर्गम भागात आपत्कालीन वैद्यकीय सेवेत सुधारणा घडवून आणतीलच शिवाय वैद्य चिकित्सालयाच्या माध्यमातून पारंपारिक आणि आधुनिक आरोग्य सेवा पद्धतींचे एकीकरण होईल.

## एकात्मिक आरोग्य सेवा : वैद्य चिकित्सालय

■ लॉईड्स मेटल अँड एनर्जीचे व्यवस्थापकीय संचालक श्री बी प्रभाकरन यांच्या नेतृत्वाखाली लॉईड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटल, हेड्री येथे 'वैद्य चिकित्सालय' चे उद्घाटन करण्यात आले. लेफ्टनंट कर्नल विक्रम मेहता, निवासी संचालक यांची विशेष उपस्थिती होती. स्थानिक ग्रामस्थांना सर्वांगीण आरोग्य सेवा देण्यासाठी हा अनोखा उपक्रम आधुनिक वैद्यकीय सुविधा आणि पारंपारिक उपचार पद्धती यांचे एकीकरण करणारा उत्तम असा उपक्रम आहे.

■ गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रशांत बोकारे यांची या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी आपल्या भाषणात पारंपारिक वैद्य देत असलेल्या औषधाच्या मूल्यावर भर दिला. त्यांनी पारंपारिक उपचार पद्धतींची प्रभावीता आणि कमीत कमी दुष्परिणामांवर प्रकाश टाकला. स्थानिक वैदू (पारंपारिक उपचार करणारे) आणि त्यांच्या अमूल्य ज्ञानाचे जतन करण्यासाठी त्यांना मान्यता आणि योग्य मोबदला देण्याचे आवाहन सुद्धा त्यांनी केले.

■ वैद्य चिकित्सालयाच्या पहिल्या टप्प्यात, येथे तीन स्थानिक वैदू - श्री. कटकू पुंगाटी, श्रीमान सोहम बडा आणि श्रीमान सोमाजी गोटा—हे आधुनिक वैद्यक व्यावसायिकांसोबत समाजाची सेवा करतील. हा उपक्रम लॉईड्सच्या शाश्वत आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे. आधुनिक तसेच पारंपारिक या दोन्ही वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट गोष्टी एकत्र करून जनतेचे आरोग्य आणि कल्याण साध्य करणे हाच यामागचा उद्देश आहे.

## एटापल्लीमध्ये रुग्णवाहिका सेवा सुरू : स्थानिकांसाठी जणू काही जीवनरेखाच

■ एका स्वतंत्र कार्यक्रमात, एटापल्ली नगर पंचायत यांच्या सहकार्याने आम्ही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी नवीन रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली. एटापल्ली येथील स्थानिकांच्या वैद्यकीय गरजा लक्षात घेऊन प्रस्तुत रुग्ण वाहिका सेवेत रुजू करण्यात आली आहे. एटापल्ली नगर पंचायत कार्यालयात झालेल्या उद्घाटन समारंभाचे नेतृत्व नगर पंचायत अध्यक्षा श्रीमती दिपयंती पेंदाम आणि लॉईड्स मेटल्सचे कार्यकारी संचालक श्री एस व्यंकटेश्वरन यांनी केले.

■ दुर्गम भागातील आपत्कालीन आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी रुग्ण वाहिका हे अतिशय महत्त्वाचे पाउल आहे. या भागात वाहतुकीची आव्हाने आहेत. अनेकदा गंभीर रुग्णांना योग्य वेळी वैद्यकीय सेवा मिळू शकत नाही. कारण, रुग्ण वाहिका नसल्यामुळे त्याना रुग्णालयात पोचायला विलंब होतो. यावेळी बोलताना श्री वेंकटेश्वरन यांनी एटापल्ली भागातील लोकांच्या सर्वच समस्यांना समाधान देण्याच्या लॉईड्सच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. या भागातील स्थानिक लोकांचा विकास आणि त्यांच्या कल्याणासाठी कंपनी सतत प्रयत्न शील असल्याची नोंद त्यांनी केली.

■ एटापल्ली उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.चैतन्य कदम, तहसीलदार श्री.एम. घांगुर्डे, आणि गटविकास अधिकारी श्री. आदिनाथ आंधळे यांच्यासह स्थानिक मान्यवरांनी उद्घाटनाला हजेरी लावली आणि समाजासाठी अत्यंत महत्त्वाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

## सामुदायिक आरोग्यासाठी सामूहिक वचनबद्धता

हेड्री येथील वैद्य चिकित्सालय आणि एटापल्ली येथील रुग्णवाहिका सेवा हे आमचे दोन उपक्रम गडचिरोली जिल्ह्यातील आरोग्यसेवा सुधारण्यात मोलाची भूमिका बजावत आहेत. आधुनिक आरोग्यसेवा उपायांसह पारंपारिक पद्धतींचे एकत्रीकरण करून आणि आपत्कालीन गरजा पूर्ण करून हे उपक्रम सेवा देत आहेत. त्यामुळे सामाजिक आरोग्यावर आणि लोककल्याणावर कायमस्वरूपी असा सकारात्मक प्रभाव पडत आहे.

## खाणकामाच्या पलीकडे: गावांमध्ये सामुदायिक आरोग्य उपक्रम

आम्ही मलेरिया आणि इतर हंगामी रोगांशी लढा देऊन निरोगी गावांसाठी प्रयत्न करत आहे. आमची कॉर्पोरेट सोशल दायित्व टीम, आमचे आउटरीच वर्कर्स आणि लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल यांच्या माध्यमातून परस्पर सहकार्य करून, खेड्यांमध्ये नियमित आरोग्य तपासणी करणे, स्वच्छता जागरुकता शिबिरे आयोजित करणे, मच्छरदाणी वितरण अशी अनेक कार्ये सुरु आहेत. फॉगिंगच्या माध्यमातून डासांची उत्पत्ती कमी करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. शिवाय गप्पी मासे जलकुंभात सोडले जात आहेत जेणे करून डासांची पैदासच होऊ नये.

मल्लमपहाडी, सुरजागड, हेड्री, मांगेर आणि गोडेली या गावांमध्ये मलेरियाच्या वाढलेल्या रुग्ण संख्येमुळे आम्ही आमच्या एलकेएएम हॉस्पिटलमध्ये २५ मलेरिया रूग्णांवर एकाच वेळी उपचार करण्याच्या सुविधा निर्माण केल्या. यासह स्वच्छतेला आणखी प्रोत्साहन देण्यासाठी, 'स्वच्छ घर' आणि 'सर्वात स्वच्छ गाव' अश्या स्पर्धा आम्ही घेत आहोत. यांमुळे स्वच्छता आणि रोग प्रतिबंधनास प्रोत्साहन मिळत आहे. गावातील स्थानिक लोकांच्या सहभाग आणि सहकार्याने स्पर्धा देखील यशस्वीरीत्या आयोजित होत आहेत.

## १२१ रक्तदात्यांनी कोनसरी येथे केले रक्तदान

आमच्या कोनसरी स्टील प्लांटमध्ये १ ऑगस्ट रोजी आयोजित रक्तदान शिबिरात १२१ व्यक्तींनी रक्तदान केले. या कार्यक्रमात LMEL चे कर्मचारी तसेच जवळपासच्या गावकऱ्यांचा उत्साही सहभाग होता. रक्तदानाच्या माध्यमातून अनेक रुग्णांचे जीव वाचवले जाऊ शकतात, आणि हीच प्रतिबद्धता या उपक्रमातून दिसून आली. उपजिल्हा रुग्णालय, अहेरी यांच्या सहकार्याने हे शिबीर आयोजित केले होते. रक्तदात्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. हा उपक्रम आमच्या सामाजिक कल्याणासाठीच्या प्रतिबद्धतेला बळकटी देतो. वर्षभरात असे अनेक रक्तदान शिबीर आयोजित करीत राहण्याचे आमचे नियोजन आहे.

## कुद्री गावात सिकलसेल तपासणी यशस्वी

१९ जून रोजी जागतिक सिकलसेल दिनानिमित्त कुद्री गावात यशस्वी सिकल सेल स्क्रीनिंग कार्यक्रम पार पडला. चाचणी केलेल्या ११६ गावकऱ्यांपैकी १६ जणांना सिकलसेल आजार असल्याचे निदान झाले. आता या रुग्णांवर उपचार आणि त्यांच्या आजाराचे व्यवस्थापन करता येईल. CSR टीम, आउटरीच वर्कर्स आणि लॉईड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटलमधील कर्मचारी यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम राबविण्यात आला. या भागातील सार्वजनिक आरोग्याच्या आव्हानांपैकी महत्त्वाचे म्हणजे सिकल सेल हा रोग आहे. या समस्येला तोंड देण्यासाठी अश्या प्रकारची स्क्रीनिंग आयोजित करणे हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

CMYK




# लॉईड्स वन्या तर्फे तंबाखू निषेध दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन

लॉईड्स वन्या क्लोदिंग कंपनीने ३१ मे २०२४ रोजी हेड्री येथील त्यांच्या गारमेंट युनिटमध्ये जनजागृती कार्यक्रमाद्वारे तंबाखूविरोधी दिन यशस्वीरीत्या साजरा केला. एकूण ३३० महिला आणि मुलींची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. या कार्यक्रमात तंबाखूमुळे आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणाम आणि संभाव्य धोक्यांवर लक्ष केंद्रित केले गेले. श्री. दिलीप बुराडे, डॉ. गोपाल रॉय आणि डॉ. आकांक्षा यांची माहितीपूर्ण भाषणे झाली. वक्त्यांनी व्यसनाधीनता, तोंडाचा कर्करोग आणि तंबाखूच्या सेवनाशी संबंधित इतर रोगांचे धोके अधोरेखित केले आणि सहभागींना निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन केले. समारंभाचा समारोप अल्पोपाहार आणि सन्मानचिन्हे देऊन झाला. या कार्यक्रमाने समाजात व्यसनमुक्त आणि निरोगी जीवनाचे महत्त्व याबद्दल जनजागृतीचे महत्वाचे कार्य साध्य झाले.

# गारमेंट युनिट ते वन्या ब्रँड: लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या उपक्रमाची गरुडझेप

जानेवारी २०२३ मध्ये, लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनच्या गारमेंट युनिटने परिवर्तनाच्या प्रवासाला सुरुवात केली. एका पुनर्निर्मित शिपमेंट कंटेनरमध्ये प्रारंभ झालेल्या छोट्याश्या प्रशिक्षण केंद्रापासून सुरु झालेला हा प्रवास प्रशंसनीय अश्या वन्या ब्रँड पर्यंत पोचला ही एक यशोगाथाच आहे. सुरजागड खाणीच्या आसपासच्या भागातील आदिवासी महिलांच्या सामूहिक प्रयत्नातून निर्माण झालेला वन्या हा ब्रांड महिला सशक्तीकरण, अथक प्रयत्न आणि नैसर्गिक कौशल्य यांचे उल्लेखनीय मिश्रण दर्शवते.

आर्थिक उन्नतीसाठी झटणाऱ्या ५० आदिवासी महिलांपासून सुरुवात करून, गारमेंट युनिटची वन्या ब्रँडमध्ये झालेली प्रगती ही गरुड झेप आहे येथील आदिवासी महिलांच्या ध्येयवेड्या प्रवासाची. 'वन कन्या' किंवा 'जंगलाची कन्या' वरून 'वन्या' हे नाव निसर्गाशी असलेल्या सखोल संबंधाचे चित्रण करते. शिवाय आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणाचे देखील हे प्रतीक आहे. ब्रँडचा लोगो हा व्यक्तीस्वातंत्र्य आणि निसर्गाला मूर्त रूप देणारा आहे. शिवाय फॅशन तसेच ते निर्माण करणाऱ्या महिला कामगारांच्या सशक्तीकरणासाठी असलेली आमची बांधिलकी देखील या लोगोतून अधोरेखित होते.






आज, वन्या हा आमचा ब्रांड त्याच्या उच्च-गुणवत्तेचे शर्ट आणि शाश्वत कार्यपद्धतींसाठी असलेल्या वचनबद्धतेसाठी प्रसिद्ध आहे. एकूण ३०० हून अधिक प्रगत मशिन्सने सुसज्ज असलेल्या या कारखान्याने ३० हजाराहून अधिक कपड्यांचे उत्पादन केले आहे. आज वन्या ब्रांड ने आर्थिक स्थैर्य तर प्राप्त केले आहेच, शिवाय अभिमान आणि मानबिंदू म्हणून तो नावारूपाला आलेला आहे.

इको-फ्रेंडली खाकी पॅकेजिंग आणि विशेष डिस्प्ले कॅनोपी यासारखे अनोखे उपक्रम वन्याच्या पर्यावरणीय जबाबदारी आणि सामाजिक सहभागीत्त्वासाठीचे समर्पण दर्शवतात. कामगारांसाठी विशेष बस आणि ब्रँडेड डिस्ट्रिब्युशन ट्रक यासह आज वन्या भविष्याकडे वाटचाल करत आहे. हे भविष्य अत्यंत उज्जवल आहे. गडचिरोलीच्या महिलाना त्यांच्या सामर्थ्य, सर्जनशीलता आणि कलात्मकतेचा नव्याने परिचय घडवून देण्यात वन्याची भूमिका महत्त्वाची आहे.



# मातृशक्ती चे सीमोल्लंघन: लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन महिलांना नवीन मार्ग शोधण्यासाठी सक्षम करते

आपल्या विविध उपक्रमांद्वारे गडचिरोलीमध्ये स्त्री-पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरणाचा मार्ग प्रशस्त करत आहे. यातील नवीनतम उपर्काम म्हणजे केवळ महिलांसाठीच असलेला एक महत्त्वाचा सुरक्षा रक्षक प्रशिक्षण कार्यक्रम होय. महिलांना सुरक्षा रक्षक म्हणून प्रशिक्षण देऊन त्यांच्यासाठी नवीन क्षेत्रात रोजगार आणि उत्पन्नाची संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम आहे. पारंपारिक रीत्या पुरुषांचे मानले गेलेले हे क्षेत्र आता मात्र स्थानिक महिलांसाठी नवीन संधी निर्माण करत आहे.

अलीकडेच ३६ दिवसांच्या कठोर प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या १५ महिलांची पहिली तुकडी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून तयार झाली. आम्ही याचा आनंद साजरा केला. हेड्री मैदानावर आयोजित, पासिंग आऊट परेड आणि समापन समारंभात त्यांच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. या उपक्रमाची समाजात परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता यातून दिसून आली. उल्लेखनीय मान्यवरांच्या उपस्थितीत, या कार्यक्रमात फाउंडेशनच्या सर्वसमावेशकता, समानता आणि शाश्वत विकासासाठी अटूट वचनबद्धतेवर पुन्हा एकदा प्रकाश टाकला गेला.

प्रशिक्षण कार्यक्रम सर्वसमावेशक होता. यात सुरक्षा मूलभूत गोष्टी जसे कि अग्निसुरक्षा, संप्रेषण आणि आपत्कालीन प्रतिसाद यासारख्या आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमातून प्रशिक्षित झालेल्या महिला सुरक्षा रक्षकांना आता सीएसआर कॉम्प्लेक्स, शाळा, रुग्णालय, गारमेंट युनिट आणि कार्यालयांसह विविध ठिकाणी बंदोबस्तावर तैनात करण्यात आले आहे. हा उपक्रम केवळ महिलांना सक्षम करत नाही तर आमच्या परिसराचे अंतर्गत सुरक्षा फ्रेमवर्क सुद्धा मजबूत करतो. शिवाय ग्रामीण भागात लैंगिक समानतेच्या दिशेने एक प्रगतीशील पाऊल म्हणून देखील हा उपक्रम अतिशय महत्त्वाचा आहे.

आमच्या विविध विभागांमध्ये महिलांच्या वाढत्या उपस्थितीतून महिला सुरक्षा राक्षकाना प्रशिक्षित करण्याची कल्पना उदयास आली. सुरक्षा शाखेत महिलांच्या प्रतिनिधीत्वाची गरज ओळखून, श्री सी. कुमारेसन, संचालक (प्रकल्प), आणि मेजर जितेंद्र नागपाल, DGM (सुरक्षा), यांनी या उपक्रम सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. श्री मोहन गाडवे, सुरक्षा प्रभारी (ग्राइंडिंग युनिट आणि सीएसआर कॉम्प्लेक्स) यांच्या मार्गदर्शनाखाली १५ महिलांच्या पहिल्या तुकडीला कठोर प्रशिक्षण देण्यात आले.

एकूण ३ महिन्यांच्या या प्रशिक्षणात सुरक्षा संबंधित मूलभूत गोष्टींपासून ते आग सुरक्षा, संप्रेषण आणि आपत्कालीन प्रतिसाद यासारख्या प्रगत विषयांपर्यंत सर्व गोष्टींचा समावेश करण्यात आला. प्रशिक्षित रक्षकांना आता CSR कॉम्प्लेक्समधील शाळा, रुग्णालय, गारमेंट युनिट आणि कार्यालयांसह महत्त्वाच्या ठिकाणी तैनात करण्यात आले आहे. हा उपक्रम गडचिरोलीतील महिलांसाठी अधिक समावेशक आणि सशक्त भविष्य निर्माण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा आणखी एक पुरावाच आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी सखी-सहेली उपक्रम

आमची CSR टीम आउटरीच वर्कर्ससह मासिक पाळीच्या स्वच्छतेशी संबंधित स्थानिक महिलांमध्ये असलेले चुकीचे समज मोडून काढण्याची आणि स्थानिक आदिवासी महिलांना सॅनिटरी पॅड वापरण्यासाठी शिक्षित करण्याची मोहिमेच हाती घेतली आहे. या कार्यक्रमाला 'सखी-सहेली' असे नाव देण्यात आले आहे. लॉईड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटल, CSR आणि ORWs टीम, गावचे सरपंच, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका आणि ग्रामस्थ यांच्या समर्पित सांघिक प्रयत्नातून, एटापल्ली तालुका, गडचिरोली अंतर्गत विविध गावांमध्ये मासिक पाळी आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात हा उपक्रम यशस्वी ठरला. महिला आणि किशोरवयीन मुलींशी मासिक पाळीदरम्यान त्यांचे आरोग्य सांभाळणे आणि स्वच्छता राखणे याविषयी डॉक्टरांनी मोकळेपणाने संवाद साधला. 'पीरियड्स नॉर्मल असतात, लज्जास्पद नसतात आणि लपवण्यासारखी गोष्ट नसते!' हा संदेश देण्यात आला. टीमने जून ते ऑगस्ट या कालावधीत २१ गावांचा समावेश असलेल्या १० आउटरीच सेंटरमध्ये आतापर्यंत २००० सॅनिटरी नॅपकिनचे वाटप केले आहे. येत्या काही महिन्यांतही ही मोहीम सुरू राहणार आहे. LIF CSR आणि ORW टीमने महिलांना दर महिन्याला ORC मधून मासिक पाळी दरम्यान च्या स्वच्छतेसाठी आवश्यक अश्या गोष्टी स्वतःहून मागण्यासाठी प्रोत्साहित केले. आमचा नक्कीच विश्वास आहे की – येणाऱ्या कालावधीत मासिक पाळी बद्दलचे गैरसमज नष्ट करण्यात आम्हाला पूर्ण यश येईल.






















| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | |
| ५ | | ६ | | ७ | |
| ८ | | | | ९ | |
| | १० | ११ | १२ | १३ | |
| | | | | | |
| | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| १९ | | | | २० | |
| २१ | | | | २२ | |
| २३ | | | | २४ | |
| २५ | २६ | २७ | | २८ | |

**आडवे :-**

१. गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख वनस्पती

१०. गडचिरोली जिल्ह्यातील वनीकरण कार्यक्रमाचा एक प्रमुख

१४. गडचिरोली जिल्ह्यात एटापल्ली तालुक्यात लोह खाण प्रकल्प कोठे आहे ?

२५. समाजसेवेचा एक महत्त्वाचा घटक.

**उभे :-**

१. ज्याचं उदाहरण घेऊन आपण पुढे काम करतो

३. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील प्रसिद्ध प्राणी

७. पाण्याचा साठा करणारा बांधकाम

१७. गडचिरोली जिल्ह्याचे नाव.

१९. लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनद्वारे दिले जाणारे विविध प्रकारचे शिक्षण.


# लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या आमच्या अविश्वसनीय टीममध्ये सामील व्हा!

*वैयक्तिक आणि व्यावसायिक वाढीसाठी प्रचंड क्षमता असलेले एक दोलायमान कार्यस्थळ. कर्मचाऱ्यांसाठी सर्वोत्कृष्ट सुविधा असलेली आणि सकारात्मक सामाजिक बदलासाठी वचनबद्ध असलेली आघाडीची कंपनी. होय, या सर्व गोष्टी तुम्ही लॉयड्स इन्फिनाइट फाउंडेशन, लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडची CSR शाखा - खाण आणि पोलाद क्षेत्रातील एक सूचीबद्ध आणि आघाडीची कंपनी येथे अनुभवू शकता. आम्ही उत्साही व्यक्तींना आमच्या दोलायमान संघात सामील होण्यासाठी आणि आमच्या समुदायाच्या वाढीसाठी योगदान देण्यासाठी आमंत्रित करत आहोत.*

**आमच्याकडे सध्या समर्पित व्यावसायिकांसाठी विविध भूमिकांमध्ये रोमांचक संधी उपलब्ध आहेत जे पूर्ण करिअरच्या प्रवासाला सुरुवात करण्यास तयार आहेत.**




**1. पद-पुरुष परिचारिका, रिक्त पदे: 3**

भूमिका: नर्सिंग उपक्रम पात्रता-किमान. बीएससी नर्सिंग

एकूण अनुभव : अनुभवानुसार 3 ते 5 वर्ष सीटीसी. & वाटाघाटी करण्यायोग्य

ठिकाण: हेड्री, ता. एटापल्ली

कृपया सुधारित सीव्ही skv@loyds.in वर शेअर करा.

**2. पद-लेखा आणि वित्त व्यवस्थापक**

भूमिका: देय खाते, प्राप्य खाते, सामान्य खाती, अंदाजपत्रक, खर्च आणि पी अँड एल

पात्रता-बी. कॉम., एमबीए फायनान्स

एकूण अनुभव. : अनुभवानुसार 11 ते 15 वर्ष सीटीसी. & वाटाघाटी करण्यायोग्य

ठिकाण: हेड्री, ता. एटापल्ली

कृपया सुधारित सीव्ही skv@loyds.in वर शेअर करा.

**3. पद: वैद्यकीय अधिकारी**

भूमिका: वैद्यकीय तपासणी, उपचार आणि समुपदेशन

पात्रता-किमान. एमबीबीएस

एकूण अनुभव : 2 ते 4 वर्षे सी. टी. सी. व्यवहार आणि वाटाघाटीनुसार

ठिकाण: हेड्री, ता. एटापल्ली

कृपया सुधारित सीव्ही skv@loyds.in वर शेअर करा.

**4. पद: ओटी टेक्निशियन**

भूमिका: ओटीमध्ये योजना आणि शेवटपर्यंत समर्थन आणि समन्वय

पात्रता-ओटी मध्ये डिप्लोमा

एकूण अनुभव : 3 ते 5 वर्षे सीटीसी एक्सपीआर आणि वाटाघाटीनुसार

ठिकाण: हेड्री, ता. एटापल्ली

कृपया सुधारित सीव्ही skv@loyds.in वर शेअर करा.

**5. पद: एच. एम. व्ही. चालक**

भूमिका: बस चालक, बॅज अनिवार्य

पात्रता-आय. टी. आय./पदव्युत्तर पदवी. : 8 ते 13 वर्षे सी. टी. सी. व्यवहार आणि वाटाघाटीनुसार

ठिकाण: हेड्री, ता. इटापल्ली

कृपया सुधारित सीव्ही skv@loyds.in वर शेअर करा.

**6. पद: शिवणकाम यंत्र चालवणारे**

पात्रता-किमान पाचवी उत्तीर्ण

वयोमर्यादा: 18 ते 35 वर्षे

**सुविधा:** मोफत जेवणाची सुविधा, ये-जा बस सुविधा

**ठिकाण:** लॉईड्स वन्या क्लोदिंग कंपनी-गार्मेंट युनिट, हेड्री, ता. एटापल्ली

या कालावधीत 6 महिन्यांचे प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती 4000 रुपये असेल

6 महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर, कौशल्य आणि कामाच्या कार्यक्षमतेच्या आधारे 6000,8000 आणि 12,500 रुपयांच्या श्रेणीत पगार दिला जाईल.

**आवश्यक कागदपत्रे:** आधार कार्ड, पॅन कार्ड, इयत्ता 5 वी ते कमाल शिक्षण लागू गुणपत्रिका किंवा हस्तांतरण प्रमाणपत्र आणि पोलिस चरित्र प्रमाणपत्र.

**कोण अर्ज करू शकते:** ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या महिला-पुरसलगोंडी, तोडसा आणि नागुलवाडी आणि पोलिस एओपी-गट्टा, वांगेतुरी, गर्देवाडा, कंडोली बुर्गी, पिपली बुर्गी गावे.

**अर्ज कसा करावा:** अधिक माहितीसाठी आणि अर्जासाठी सीएसआर कार्यालय, हेड्री येथे संपर्क साधा किंवा 9420115044,9284007081 या क्रमांकावर संपर्क साधा.